नियमित दिवाणी दावा क्र. १६८/२०२२
तानाजी पिसाळ वगैरे विरुध्द विशाखा खंडागळे वगैरे
CNR:MHSN14-001075-2022

## नि.क्र. ४१ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ यांनी प्रतिदाव्यातील वादी नं. १ यांचेविरुध्द तांत्रीकदृष्ट्या झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. मूळ वादीने निरंतर व मॅण्डेटरी मनाईसाठी तसेच वाटपासाठी मूळ दावा दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्यास व ताकीद अर्जास प्रतिदाव्यातील वादींनी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे मूळ दाव्याविरुध्द प्रतिदावा देखील दाखल केलेला आहे. सदर कामातील प्रतिदाव्यातील वादी नं. १ हे १ नोव्हेंबर २०२४ रोजी मयत असून सदर प्रतिदाव्यातील वादीचे सरळ कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणे न्यायासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**२.** प्रतिदाव्यातील वादी नं. १ ची वारस मुले ही प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ हे पूर्वीपासून सदरकामी सामील आहेत. प्रतिदाव्यातील वादी नं. १ ची पत्नी व मुलगी हे प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सरळ व कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. तथापी, प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सदर वारस हे नाशिक येथे कायमस्वरुपी राहणेस असून सदरकामी प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे वारस म्हणून सामील होणेस तयार नसल्यामुळे त्यांना सदरकामी प्रतिदाव्यातील प्रतिवादी म्हणून सामील करुन वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणे आवश्यक आहे.

**३.** प्रतिदाव्यातील वादी नं. १ हे मयत झाल्यानंतर वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज नजरचुकीने व अनावधानाने कायदेशीर मुदतीत देता आलेला नाही. वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सर प्रतिदाव्यातील वादींनी टाळाटाळ केलेली नव्हती व नाही. वारस रेकॉर्डवर मुदतीत न घेतलेमुळे प्रतिदावा अबेट झालेला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे परिस्थिती असल्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द

करुन प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सरळ कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणेस प्रतिदाव्यातील वादींना परवानगी मिळणे न्यायासाठी आवश्यक आहे. सबब, तांत्रीकदृष्ट्या झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे सरळ कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणेस प्रतिदाव्यातील वादींना परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**४.** प्रस्तुत अर्जास नि.क्र. ४० अर्जाचे पाठीमागेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन असे कथन केले की, प्रतिदाव्यातील वादी यांचा सदरचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकूर हा खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर असून प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपूर्वक व मुद्दामहून सुमारे सात महिन्यांचा विलंब केलेला आहे. त्यासाठी त्यांनी कोणतेही संयुक्तिक कारण अर्जात नमूद केलेले नाही. अर्जात नमूद कारणे ही खोटी व लबाडीची आहेत. वस्तुतः अर्जात विलंबाबातचे कोणतेही कारण नमूद नाही. विलंब सात महिन्यापेक्षा जास्त कालावधीचा असून देखील जाणीवपूर्वक पाच ते सहा महिन्यांचा विलंब अंदाजाने माफ करुन मागितला आहे. ही पूर्णपणे चुकीची व बेकायदेशीर बाब असून सदर प्रतिवादी यांना केव्हाही कबुल नव्हते व नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा तसेच जाणीवपूर्वक विलंब केल्यामुळे प्रतिदावेतील वादी यांना हेवी कॉस्ट करण्यात यावी असे कथन केले आहे.

**५.** दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. मूळ दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द, वाटप व निरंतर मनाईचा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील वादी यांनी नजरचुकीने व अनावधनाने वादी नं. १ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले. त्यामुळे त्यांना अर्ज देण्यासाठी विलंब झाल्याचे दिसते. मात्र, दावा वाटप व निरंतर मनाई करीता असल्यामुळे व प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला असल्यामुळे मयताचे वारसांचा देखील दावा मिळकतीमध्ये हक्क,

हितसंबंध आहे. दावा व प्रतिदावा गुणदोषांवर चालण्याकरिता प्रतिदाव्यातील वादी नं. १ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. मात्र प्रतिदाव्यातील वादी नं. १ विरुध्द तांत्रीकदृष्ट्या झालेल्या अबेटमेंटचा हुकूम रद्द करुन मिळणेकरिता झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून त्यांनी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना र.रु. २००/- कॉस्ट देऊन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज नि.क्र. ४१ प्रतिदाव्यातील वादी नं. २ व ३ यांनी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना र.रु. २००/- कॉस्ट देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2026.02.26 16:51:22 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक २५/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar, |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 25/02/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 26/02/2026 |
| Order uploaded on | : | 26/02/2026 |